Volume-3 Issue-3 January 2015 ISSN 2319-9962

BEACON

Of Teacher Education

BEACON

Of Teacher's Education

January 2015

Dr. Raamaa A. Bhoslay
Editor

Prof. S. S. Paithankar
Executive Editor

Prof. P. P. Subhedar
Associate Editor

Advisory Board
Nitin Thakoor
Dr. Jyotsna Thakoor

Contact
8380096116 or 9022530644
govt_bedcollege@rediffmail.com

Sachin Bhandalkar
Sujata Nalawade
Cover Concept and Design

The views expressed in the articles published are the individual opinions of the respective authors and they in no way reflect or represent the opinion of 'Beacon of Teacher's Education' nor does 'Beacon of Teacher's Education' subscribe to these views in any way.

Printer Publisher and Editor Dr. Raamaa A. Bhoslay, Principal, Goverment College of Education, Panvel has printed this trilingual annual at M.R.P. Enterprizes, Mulund West, Mumbai 400080 and published the same at 115, Chandrabhaga, Apt. 3rd Floor, Kapad Bazar, Panvel.

EDITORIAL

Esteem Readers,

I am very much delighted to put successfully third issue of **'Beacon of Teacher Education'**, which is going to be published annually. This issue is dedicated to the subject 'Skill Development in Teacher Education'. It is in this Context that an additional effort requires to be convened to sensitize the system for better realization and awareness about teachers' role and responsibility.

The main focus of this issue is to transmit basic knowledge of skill development in Teacher Education and to foster its integration into teaching. The goal is to pave the way for a teacher to enhance his teaching skills. A skill is a learned ability to do something well. Skillful teachers improve quality of education and quality education shapes future of the nation. Nation cannot develop beyond the quality of its educational system.

Development through education becomes narrowed down to individualistic and alienated levels, so, our youth today need to equip themselves with knowledge, skills, attitude and competencies which will enable them to face the global challenges. United Nations declared the period 2005-2014 as the "Decade of Education for Sustainable Development in an era of dehumanizing alienation and callous competition, quality and sustain-ability should be universally maintained in every realm especially in teacher education. Sustainable Development is not possible without skill development. Skill Development is a dynamic concept that utilizes all aspects of public awareness, education and training to create an understanding of the challenges. In today's era only skillful, quality teachers have high demand everywhere.

In future teachers will have to face enormous new challenges and while doing this they will have to acquire new skills. For this to prepare them in all the way, so that they should face all challenges successfully. This is the main motive of this journal. This is a Dias for teachers. It works as a lighthouse to the teachers.

Chief Editor,
Dr. Raamaa A. Bhoslay
Principal
Govt. College of Education, Panvel.

CONTENT

01 बीजभाषण
डॉ. ह.ना. जगताप

04 A Concept of Teaching and professional portfolio
Dr. Ashwin Kailas Bondarde

09 Development of a microteaching workshop...
Dr. Madhukar Barad
Dr. Geetangali Patil

15 Competency Development for Effective Administrative
Subhaskumar Patil

20 Enhancing Teaching Excellence through competencies Development...
Madhuri Bendale

25 Competencies Development in Teacher Education...
Shri. Bhosale Ramesh Sandipan

28 Competencies Development in Teacher Education...
Dr. Suvidyaa Sarvankar

32 Life skills in Teacher Education
Dr. Mrs. Nilima Arvind More

37 Impact of co-operative learing on Teacher Trainees
Mrs. Jyotsna Thakoor

42 A Study of Developing measures of Geo Environment...
Anjana Paul

47 A Study of skills used by teachers for identicication....
Dr.Raamaa Bhoslay
satindar kaur Gandhi

50 Comptencies Development in Teacher Education
Mrs. Kurane Arundhati S.

55 Standards for Teachers Competence in Educational Assessment of Students
Mr. Vithoba Sawant
Mr. Sheetal S. Kadam

61 Competency Development and teacher Empowerment
Dr. Saramma Chandy

67 बहुआयामी स्वयं अध्ययन
Dr.Vijaykumar Paikrao
Prof. Dayaram pawar

70 शिक्षक : शिक्षणातील क्षमता व त्यांच्या विकासासाठी उपक्रम
गांगुर्डे रवींद्र गोविंदराव

73 बी.एड. छात्राध्यापकांच्या स्वक्षमता मर्यादा विश्लेषणाचा आणि कुलउपक्रमांचा क्षमता-कौशल्य विकासामधील योगदानाचा अभ्यास
प्रा. डॉ. रावसाहेब शेळके

ISSN 2319 – 9962

बहुआयामी स्वयं अध्ययन

सारांश :

स्वयं अध्ययन निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ज्ञानात्मक समाजात निर्मितीसाठी अध्ययनार्थीत शिकण्याची वृत्ती विकसित करण्यासाठी स्वयं अध्ययन हा प्रभावी विकल्प होय. अध्ययनार्थीने, स्वयंप्रेरणेने, स्वयंगतीने रुची व क्षमतेनुसार स्वत:हून शिकणे म्हणजे स्वयं अध्ययन होय. शिक्षणासाठी अध्यापनाकांवर अवलंबून न राहता अद्ययावत माहितीचा संग्रह करणे क्रमप्राप्त आहे. याकरिता विद्यार्थ्यामध्ये शिकण्याची स्वत:हून ज्ञान मिळविण्याची प्रेरणा निर्माण करणे ही अध्यापकांची जबाबदारी आहे. अध्ययनार्थीच्या बहुआयामी प्रगती व विकासासाठी बोधात्मक, भावनात्मक आणि क्रियात्मक स्वयं अध्ययन महत्वपूर्ण आहे. सदरील संकल्पनात्मक शोधनिबंधात बहुआयामी स्वयं अध्ययनाची विविध अंगे-स्वत: ऐकणे, स्वत: बोलणे, स्वत:वाचणे, स्वत:हिशोब करणे, स्वत:चा अंदाज करणे, स्वत:तर्क करणे, स्वत:च्या विविध कलांची ओळख करुन रसस्वाद करणे, स्वत:डोळ्यांनी पाहणे अन जसे दिसते ते स्वत:च्या अनुभवानुसार आत्मसात करणे अर्थात अत्तदीपभव स्वंयदीपभव ही स्वयं अध्ययनाची विविध अंगे होत. ह्या स्वयं अध्ययननाच्या विविध बाबीवर ह्या शोधनिबंधात प्रकाश टाकलेला आहे.

Prof. Vijaykumar Paikrao

Prof. Dayaram D. Pawar

School Of Education, YCM
Open University, Nashik 422222

प्रास्तविक :-

स्वयं अध्ययन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ज्ञानात्मक समाजात निर्मितीसाठी अध्ययनार्थीत शिकण्याची वृत्ती विकसित करण्यासाठी स्वयं अध्ययन हा प्रभावी विकल्प होय. अध्ययनार्थीने, स्वयंप्रेरणेने, स्वयंगतीने रुची व क्षमतेनुसार स्वत:हून शिकणे म्हणजे स्वयं अध्ययन होय. यामध्ये वैयक्तिक जबाबदारीला विशेष महत्व आहे. अध्ययनार्थी स्वत: विविध माहिती स्त्रोतांच्या साहाय्याने ज्ञानाचे ग्रहण करतो. यात अभ्यासपूरक माहिती मिळविणे व तिचे विश्लेषण करणे, पृथ्थकरण करणे, स्वयंमूल्यमापन करणे ह्या सर्वांचा समावेश होतो.

व्याख्या :- Self learing is a process in which individuals take the initiative with or without the help of others, in diagnosing their learing needs formulating learing goals, indentifying human and material resources for learing, choosing and implemeting Appropriate learing strategies and evaluating learing outcomes.

शिक्षणासाठी अध्यापनाकांवर अवलंबून न राहता अद्ययावत माहितीचा संग्रह करणे क्रमप्राप्त आहे. याकरीता विद्यार्थ्यामध्ये शिकण्याची स्वत:हून ज्ञान मिळविण्याची प्रेरणा निर्माण करणे ही अध्यापकांची जबाबदारी आहे. व्यक्तीने आयुष्यभर अध्ययनार्थी असावे ही वृत्ती रुजविण्यासाठी स्वयं अध्ययनाची अत्यंत आवश्यकता आहे. मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून वायगोस्की, जेरोम, ब्रुनर इ. च्या उपपत्तीवर आधारित सामाजिक व अनौपचारिक वातावरण स्वयं अध्ययनासाठी अधिक उपयुक्त असते. असे ज्ञान व कौशल्य अध्ययनार्थीच्या दैनंदिन काळ स्मरणात राहते. स्वयं अध्ययनाचे महत्व :- अध्ययनार्थीच्या बहुआयामी प्रगती व विकासासाठी बोधात्मक, भावनात्मक आणि क्रियात्मक स्वयं अध्ययन महत्वपुर्ण आहे. त्यांच्यात पुढील गुणांचा विकास होतो.



स्वयं अध्ययनाच्या विविध कार्यानिती (Strategies of self learing)

अ)प्रकल्प पध्दती (Project Method)

प्रकल्प करण्यास सांगून त्यासंबंधीत माहितीचे स्त्रोत शोधणे

माहितीचा संग्रह करुन अहवाल लेखन करणे. इ जबाबदारी

आ) व्यक्तिगत विकास योजना (Individual Development Plan)

वैयक्तिक ध्येय निश्चित करून त्यानुसार कृतिआराखडा तयार केला जातो. विद्यार्थी स्वयं पर्यवेक्षण, स्वयं परीक्षण व स्वयं अध्ययन करतात.

इ)समुपदेश करणे (Mentoring)

देण्याची जबाबदारी अध्यापकाची आणि वर्गातील हुशार अध्ययनार्थीची असते. जेणेकरुन त्यांच्या अडचणी, समस्या दूर करुन अभ्यासाची उजळणी करुन त्यांना मार्गदर्शन सल्लामसलत, चर्चा इ. माध्यमानी त्यांना अपेक्षित पातळीपर्यंत घेऊन जाण्यास सहकार्य करणे म्हणजे समुपदेशन होय.

ई) सहअध्यायी गट (Learing Group)

असणाऱ्या सहअध्यायीचे गट तयार करुन त्यांना स्वयं अध्ययनासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्यांचे समान वयोगट, समान आशय, समान बौध्दिकपातळी, समान रूची इ. मुळे सहजगतीने अध्ययन घडून येण्यास सहकार्य घडते. त्यास सहअध्यायी गटातील स्वयंअध्यय असे म्हणतात.

उ) सहकार्यशील अध्ययन (Co-operative learing) :- सहकार्यशील अध्ययनप्रकियेत अध्ययनार्थीनी छोट्या छोट्या समुहात विभागणी करुन त्यांच्यातील परस्पर आंतरक्रियेतून अध्ययनास चालना दिली जाते. या गटामध्ये यशासाठी स्पर्धा नसून सहकार्याचे वातावरण निर्माण केले जाते. गटातील अध्ययनार्थी परस्पर अंतर्गत सहकार्यशील वृत्तीने अध्ययन करतात.

ऊ) समस्या निराकरण (Problem Solving) :- अध्ययनार्थीना रोजच्या जीवनाशी निगडीत एखादी समस्या देऊन, त्या समस्येचे समाधान शोधण्यासाठी समस्येचे पृथक्करण करुन संभाव्य उपाययोजना शोधणे, त्या उपायांचे परीक्षण करुन शेवटी योग्य उपायाची निवड करणे अपेक्षित असते.

शिक्षक व संमंत्रकांची स्वयंअध्ययनात भूमिका :-

अध्ययनानंतर विस्मरण होऊन जे शिल्लक उरते ते शिक्षण होय. असे स्किनर या मानस- तत्ववेत्यांनी प्रतियादित केले आहे. (Education is what survives when what has been learned has been forgotten. (B.F.Skinner) स्वयं अध्ययनातून प्राप्त झालेले ज्ञान कौशल्य दीर्घकाळ स्मरणात राहते. या अध्ययनात अध्ययनार्थीचा प्रत्यक्ष कृतियुक्त सहभाग अपेक्षित असला तरी शिक्षकांची व समत्रकांची भूमिका पडद्यामागील सूत्रधाराची आहे. त्यांनी अध्ययनार्थीना प्रोत्साहन केले पाहिजे.

१) अध्ययनार्थीस अध्ययनप्रक्रियेतील त्यांच्या भूमिकेची जाणीव करुन देणे. का शिकावे? कसे शिकावे? हे स्पष्टपणे सांगणे आवश्यक आहे.

२) अध्ययनार्थ्यामध्ये निर्णयक्षमतेचा विकास करणे. यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार अभ्यासविषयक घटकांची निवड करुन आनंददायी अध्ययनाची प्रेरणा मिळेल.

३) अध्ययनार्थीस स्वयं परीक्षणाची, स्वयं मूल्यमापनाची सवय शिक्षकांनी व संमंत्रकांनी लावली. तसेच त्यांनी केलेल्या कार्यानिंदाविषयी विमर्षी चिंतनाची (Reflective thinking) सवय लावावी.

४) शिक्षकांनी वर्गाध्यापन व संमंत्रण करतांना अध्ययनार्थीसमोर रोजच्या जीवनातील समस्या देऊन त्यावरील उपाय शोधण्यासाठी गटकार्याचे आयोजन करणे आणि त्यांना गटाची व वैयक्तिक जबाबदारीविषयी सविस्तर माहिती देणे अपेक्षित आहे.

५) शिक्षक व संमंत्रकांची भूमिका संप्रेरकाची (Facilitator)ची असावी. शाळेत स्वयं अध्ययनाला पूरक वातावरण निर्मिती करणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे. ज्याकरिता पुढील साधन सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे.

(अ) समृद्ध ग्रंथभांडार, बहुविध पुस्तकाचे संग्रह उपलब्ध करुन द्यावेत.

(आ)अध्ययनोपयोगी पूरक शैक्षणिक साधनांची उपलब्धता करुन देणे.

(इ) अध्ययनास अनुकूल, पोषक वातावरणनिर्मिती उपलब्ध करुन द्यावी.

(ई) समस्या निराकरण, प्रकल्प, चर्चा, परिसंवाद, गटकार्य इ. अध्ययन अध्यापनपद्धतीचा उचित वापर करुन स्वयं अध्यायनास प्रेरणा द्यावी.

क्रमन्वित अध्ययन :- संगणकअनुदेशित अध्ययनप्रणाली इ. पध्दती द्वारे स्वयं अध्ययनाची आवड निर्माण व्हावी या कीरता प्रयत्न करावेत. अध्ययनार्थीस शिकविणे महत्वाचे नसून प्रत्येक अध्यायनार्थीत शिकण्याची इच्छा जागृत करणे अधिक महत्वाचे आहे. तसेच ज्ञानयुगातील अध्ययनार्थी ज्ञानाचा उपासक म्हणून तयार होणे. गरजेचे आहे. हे ज्ञान शिक्षक किंवा संमंत्रक एकटा वर्गात देऊच शकत नाही. म्हणून स्वयं अध्ययनाची सवय निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. असे प्रतिपादन जॉन लुबबॉक ह्यांनी केलेले आहे. यातुन अध्ययनार्थीत आत्मविश्वास, जीवनकौशल्याचा विकास घडून येतो. स्वयं अध्ययनाची परंपरा ही गौरवशाली ज्ञानगंगोत्री भूमी ही अध्ययनार्थ्यीची.

स्वंय शिक्षणाची विविध अंगे :-स्वंय शिक्षणाची विविध अंगे खालीलप्रमाणे आहेत.



समारोप :- अंतत:बहुआयामी स्वंय अध्ययना ही मुक्त व दूर शिक्षण अध्ययनातील शिक्षण प्रशिक्षणासाठी आवश्यक अशी ही कौशल्ये आहेत. यामध्ये प्रकल्प पध्दती,व्यक्तिगत विकास योजना,सहअध्यायी गट,सहकार्यशिल अध्ययन, समस्या निराकरण याबरोबरच स्वंय शिक्षणाची विविध अंगे ही याकरीता

उपयोगी आहेत.त्याचा प्रत्यय शिक्षणशास्त्र निष्णात एम.एड अध्ययनार्थीबरोबरच संमंत्रण करतांना वेळोवेळी प्रत्ययास आला आहे.

संदर्भग्रंथ सूची :-

१) जोशी अनंत,(संपादन),१९९९,आशययुक्त अध्यापन पध्दती, नाशिक, यचममुवि प्रकाशन.

२) साळुंके कविता, पाईकराव विजयकुमार (संपादन), २००८ शिक्षण आणि अध्यापक शिक्षण विकीर्ण चिंतन, नाशिक, शिक्षण प्रशिक्षण प्रकाशन.

३) पाईकराव विजयकुमार व इतर,२००८, संमंत्रण तंत्र व मंत्र, नाशिक, यचममुवि प्रकाशन

४) रिसवडकर म.रा., २००५, शोधनिबंध लेखन व साधननिर्मीती, नाशिक, यचममुवि प्रकाशन.